ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 10 + 8 + 8 = 26 ] [ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 7

Total No. of Questions : 10 + 8 + 8 = 26 ] [ Total No. of Printed Pages : 7

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 250-M (NS)**

**Code No. : 250-M (NS)**

# ಕಲಿಕೆಯನ್ನು ಅನುಕೂಲಿಸುವುದು (ಹಿ.ಪ್ರಾ.ಶಾ.)
# ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ – ಮರಾಠಿ
# FACILITATING LEARNING ( HPS )
# FIRST LANGUAGE — MARATHI

**(ಹೊಸ ಪಠ್ಯವಸ್ತು)**

**( New Syllabus )**

ದಿನಾಂಕ : 06. 06. 2017 ]

Date : 06. 06. 2017 ]

ಸಮಯ : ಮಧ್ಯಾಹ್ನ 2.00 ರಿಂದ 5.00 ರವರೆಗೆ ] [ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 60

Time : 2.00 P.M. to 5.00 P.M. ] [ Max. Marks : 60

*ಅಭ್ಯರ್ಥಿಯ ನೋಂದಣಿ ಸಂಖ್ಯೆ*

*Register Number of the Candidate*

**सामान्य सूचना :**

i) ही प्रश्नपत्रिका 60 गुणांची आहे.

ii) प्रत्येक उत्तराचे चिंतन, संघटन करून या प्रश्नपत्रिकेमधोल उत्तरे लिहीण्यासाठी 3 तास अवधी दिलेला आहे.

iii) प्रत्येक प्रश्नाचे उत्तर दिलेल्या सूचने प्रमाणे लिहा.

**भाग - 1**

I. खालील प्रश्नाना चार बहुपर्यायी उत्तरे दिलेली आहेत. त्यातील योग्य पर्याय निवडा व लिहा. प्रत्येक प्रश्नाला एक गुण दिलेला आहे. 10 × 1 = 10

1. शिक्षकाजवळ शब्द भांडार इतका असावा

(अ) साधारण (आ) विपूल

(इ) मर्यादित (ई) ज्ञान देण्यापुरता.

2. बालकाच्या भाषिक विकासाचे प्रमुख केंद्र हे आहे.

(अ) घर (आ) परिसर

(इ) शाळा (ई) कुटूंब.

3. या घरातून आलेल्या मुलाला भाषेचा वापर करण्याची संधी मिळते. त्याची शब्दसंपंती समृद्ध असते.

(अ) श्रम करणाऱ्यांच्या घरातून

(आ) गवंडी काम करणाऱ्यांच्या घरातून

(इ) मजूर काम करणाऱ्यांच्या घरातून

(ई) गायकाच्या घरातून.

4. आपण जी भाषा बोलतो ती ही आहे.

(अ) प्रादेशिक (आ) राज्यभाषा

(इ) बोली भाषा (ई) आंतरराष्ट्रीय भाषा.

5. शिक्षक मुलांच्या घरच्या भाषेबद्दल असे असावेत.

(अ) तिरस्कार करणारे (आ) अपमान करणारे

(इ) स्वीकार करणारे (ई) गौरव करणारे.

6. पाठाच्या पायऱ्यांमध्ये महत्वाची पायरी ही आहे

(अ) विस्तार करणे (आ) परिशोध घेणे

(इ) सहभागी होणे (ई) मूल्यमापन करणे.

7. संभाषण म्हणजे हे होय

(अ) एकाने बोलणे व दुसऱ्याने ऐकणे

(आ) चांगले व्याख्यान देणे

(इ) आपापसात कुजबूज करणे

(ई) दोन व्यक्तीची एकमेकांशी परस्पर बोलणे.

8. अवधान म्हणजे हे आहे

(अ) श्रवण करणे (आ) लक्ष केंद्रीत करणे

(इ) आकलन (ई) ग्रहण करणे.

9. आशुभाषण म्हणजे हे होय.

(अ) अचानक बोलणे

(आ) जास्त तयारी करुन बोलणे

(इ) दिलेल्या वेळेत, दिलेल्या विषयाबद्दल बोलणे

(ई) तयारी नसताना बोलणे.

10. लेखनात याला अधिक महत्व आहे.

(अ) निबंध लेखनाला (आ) श्रुतलेखनाला

(इ) अनुलेखनाला (ई) हस्ताक्षराला.

**भाग - 2**

II. खालील कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे लिहा. ( प्रत्येक प्रश्नाला 5 गुण आहेत ) : 5 × 2 = 10

1. साहित्याचे विविध प्रकार सांगा.

2. खाली दिलेल्या व्याकरण अध्ययनाच्या पायऱ्या क्रमवार मांडा :

   i) उपयोगिलेल्या नियमांचे सामान्यीकरण

   ii) भाषेचा उपयोग

   iii) पुढे विकास करण्याचा उपयोग

   iv) उपयोगाबाबत जागृती.

3. मौखिक कृतीत लक्षात ठेवावयाच्या कोणत्याही चार अंशांची यादी तयार करा.

4. प्रकट वाचन म्हणजे काय ?

5. वाचन केलेल्या विषय वस्तुचा सारांश तयार करताना लक्षात ठेवावयाचे कोणतेही दोन अंश स्पष्ट करा.

6. भाषा व इतर विषय शिक्षकाचा समन्यव कसा असावा ?

7. पाठ नियोजनाची आवश्यकता सांगा.

8. अध्यापन करताना अध्ययन सामुग्रीचा वापर का करावा ?

**भाग - 3**

III. या भागात आठ प्रश्नांची उत्तरे लिहीली पाहिजेत. प्रत्येक प्रश्नात **अ** आणि **आ** असे दोन प्रश्न दिलेले आहेत. त्यापैकी कोणताही एक प्रश्न लिहीणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर किमान एक पृष्ठ असावे. ( प्रत्येक प्रश्नाला 5 गुण आहेत ) : 8 × 5 = 40

1. अ) भाषेचा आदर्श शिक्षक होण्यास शिक्षकाजवळ कोणकोणते गुण असणे आवश्यक आहे ?

**किंवा**

आ) भाषा व समाज यांचा संबंध उदाहरणाने चर्चा करा.

2. अ) मुलाला त्याच्या घरच्या भाषेतून शाळेच्या भाषेत रूपांतर करण्यास काय केले पाहिजे ?

**किंवा**

आ) वाचन म्हणजे काय ? वाचन हे निरंतरपणे अभिवृद्धी करणारे कौशल्य आहे. स्पष्ट करा.

3. अ) रचनावादी सिद्धांताधारीत पाच पायऱ्याचे ( 5E ) महत्व विशद करा.

**किंवा**

आ) प्रबंध आणि निबंध यातील फरक सांगा.

4. अ) मौखिक अभिव्यक्ती विकसित करण्यास, करण्यात येणाऱ्या कृतीत पूर्व नियम किंवा अटी का महत्वाच्या आहेत ? चर्चा करा.

**किंवा**

आ) मुलांना कथा सांगण्या अगोदर शिक्षकांने कोणती तयारी करणे आवश्यक आहे ?

5. अ) लेखन प्रक्रियेच्या पाच पायऱ्या स्पष्ट करा.

**किंवा**

आ) भाषा व चिंतन एकमेकाला पुरक असतात. चर्चा करा.

6. अ) शिक्षकाचे व वर्गातील विद्यार्थ्यांचे नाते कसे असले पाहिजे ?

**किंवा**

आ) ‘‘बहुभाषा वर्ग हे भाषा अध्ययन प्रक्रिया समृद्ध करतात.’’ चर्चा करा.

7. अ) मुलांमध्ये त्यांच्या घरच्या भाषेचा शालेय भाषेतून गौरव केला जातो. ही भावना मुलांमध्ये कशाप्रकारे जागृत कराल ?

**किंवा**

आ) भाषा अध्यापनाच्या मूल्यमापनात लक्षात ठेवावयाचे अंश कोणते ? चर्चा करा.

8. अ) पाठ नियोजन म्हणजे काय ? पाठ नियोजनाची आवश्यकता सांगा.

**किंवा**

आ) वर्गात भाषा अध्ययनाची अनुकूलता निर्माण करण्यास शिक्षकांने कोणते उपक्रम हाती घेतले पाहिजेत ?